**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ०४ दिनांक ०९/०१/२०२५

# नागरीकांसाठी पालघर पोलीस दलाची अधिकृत वेबसाईट कार्यान्वीत असलेबाबत.

पोलीस दलासंदर्भात घडणाऱ्या दैनंदिन घडामोडींची माहिती प्रसारीत करण्यासाठी तसेच पोलीस दलासंदर्भात अशी प्रसारीत केलेली माहिती नागरीकांना सहज उपलब्ध व्हावी व नागरीकांना ऑनलाईन तक्रार करता यावी या अनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलाकडून अधिकृत वेबसाईट **https://palgharpolice.gov.in/** ही कार्यान्वीत केलेली आहे.

सदर वेबसाईटमध्ये पोलीस दलाविषयी दैनंदिन घडणाऱ्या घडामोडीची प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट), भाडेकरु माहिती, नागरीक अलर्ट वॉल, चांगली कामगिरी, महिला व बालकांसाठी हेल्पलाईन नंबर, डायल ११२ हेल्पलाईन नंबर, सर्व पोलीस ठाणे मेल आयडी व मोबाईल क्रमांक, सर्व पोलीस ठाणे माहिती, ताज्या बातम्या, वरिष्ठ अधिकारी माहिती, संपर्कात राहण्यासाठी पालघर पोलीस दलाचे फेसबुक व व्टिटर पेज, सायबर सुरक्षा टिप्स, विशेष पथक, नागरीकांसाठी इतर महत्वाच्या वेबसाईट, माहिती अधिकार कायद्यानुसार उपलब्ध करुन देण्यात येणारी माहिती, आंतरजातीय/आंतरधर्मीय जोडप्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी कक्ष, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, दहशतवाद विरोधी कक्ष, ऑनलाईन तक्रार नोंद करण्यासाठी सुविधा, पोलीस भरती संदर्भात जाहिरात व निकाल, सायबर गुन्हे घडू नयेत यासाठीची माहिती, सामुहीक हिंसा संदर्भात माहिती, प्रथम खबरी अहवालाविषयी माहिती अशा प्रकारची माहिती दररोज अद्ययावत करण्यात येते. तसेच पालघर पोलीस दलाचे अधिकृत ट्विटर, फेसबुक व इंस्टाग्राम हे पेज देखील नागरीकांसाठी उपलब्ध असून त्याची लिंक खालीलप्रमाणे आहेत.

१. **ट्विटर अकाउंट लिंक :**
https://x.com/Palghar_Police?t=nbpAEnrVvePXPdxMuX_BUA&s=08
२. **फेसबुक पेज लिंक :**
https://www.facebook.com/PalgharDistrictPolice?mibextid=ZbWKwL
३. **इंस्टाग्राम पेज लिंक :**
https://www.instagram.com/palghar.police?igsh=bXhkYzkxeGgwMzl2

पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वेबसाईटवर ऑनलाईन तक्रार करण्याची सुविधा नागरीकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आजपर्यंत पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वेबसाईटला एकूण ५,८९,६२८ नागरीकांनी भेट दिलेली आहे. तरी सर्व नागरीकांना पालघर जिल्हा पोलीस दलाकडून आवाहन करण्यात येते कि, पालघर पोलीस दलाची अधिकृत वेबसाईट **https://palgharpolice.gov.in/** चा तसेच वर दिलेले ट्विटर, फेसबुक व इंस्टाग्राम अकाउंटचा जास्तीत जास्त लाभ घेण्यात यावा.